*अतितात्काळ*

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हीसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ द्वारा संचालित विद्यापीठ)

(महाविद्यालयीन शाखा)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४०००१.

दूरध्वनी: कार्यालय: ०७१२–२५२९९३२, फॅक्स : ०७१२–२५५५७०१

## :: प रि प त्र क ::

क्रमांक : रातुमनावि/म.वि/०९/२८४० दिनांक : ~~२३~~ २५ सप्टेंबर, २००९

Maharashtra Federation of University & College Teacher's Organization (MFUCTO) या संघटनेने विविध मागण्यांच्या अनुषंगाने दिनांक १४ जुलै पासून २६ ऑगस्ट, २००९ पर्यंत संप सुरू ठेवला होता. संघटनेच्या मागण्यासंदर्भात शेवटची बैठक दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण आणि मा. मुख्य सचिव यांच्या बरोबर संपन्न झाली. या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार दिनांक २७ ऑगस्ट, २००९ पासून संप मागे घेण्यात आला. बैठकीमध्ये शिक्षकांना संप कालावधीतील पगार तूर्त अदा करण्यात येऊ नये असे ठरले. तथापि, संपाच्या कालावधीत विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान शिक्षकांना अनुज्ञेय असलेल्या Vacation leave च्या कालावधीत अधिकचे तास घेऊन भरून काढावे व विहित अभ्यासक्रम पूर्ण करावा. तसेच संबंधित शिक्षकांनी संपाचे पूर्ण दिवस भरून काढले आहेत किंवा कसे, याबाबत संबंधित विद्यापीठाने खात्री करून तशाप्रकारचे प्रमाणपत्र संबंधीत विभागीय सह–संचालक (उच्च शिक्षण) यांच्याकडे सादर करावे. विद्यापीठाने असे प्रमाणपत्र संबंधित सह–संचालकांना सादर केल्यावर या संप कालावधीचा पगार देण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत.

यासंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकाच्या अनुषंगाने मा. कुलगुरूंनी दिनांक १४ सप्टेंबर, २००९ रोजी दुपारी २.०० वाजता विद्यापीठाशी संलग्नित सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांच्या प्राचार्यांची सभा आयोजित केली होती., वर नमूद परिपत्रकातील निर्देशांची माहिती मा. कुलगुरूंनी प्राचार्यांना या सभेत दिली.

प्राचार्यांच्या सभेत ठरल्याप्रमाणे शासनाचे दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ रोजीचे निर्देश विचारात घेऊन दिनांक १४ जुलै, २००९ पासून २६ ऑगस्ट, २००९ पर्यंत एकूण ४४ दिवसाचे शिक्षकांच्या संपामुळे विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये आणि रविवारी विद्यार्थ्यांचे अधिकचे वर्ग घेऊन अध्यापनाचे तास भरून काढण्यासाठी वेळापत्रक तयार करण्यासाठी सभेत विचार–विनिमय करण्यात आला.

शिक्षकांच्या एकूण ४४ दिवसाच्या संपकालावधीमध्ये ८ दिवसाच्या सार्वजनिक सुट्ट्या आल्यामुळे प्रत्यक्षात ३६ दिवसाच्या अध्यापनाचे नुकसान झाल्याची बाब लक्षात घेऊन संप कालावधीमधील अध्यापनाचे तास भरून काढण्यासाठी पुढीलप्रमाणे वेळापत्रक तयार करण्यात आले.

| अ. क्र. | सुट्ट्यामधील अध्यापनाचे दिवस | भरून निघणाऱ्या दिवसांची संख्या |
|---|---|---|
| १. | रविवार दिनांक २० व २७ सप्टेंबर, २००९ | २ दिवस |
| २. | रविवार दिनांक ४ आक्टोबर, २००९ | १ दिवस |
| ३. | दिनांक २० ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर, २००९ (दिवाळीच्या सुट्ट्या) | २७ दिवस |
| ४. | रविवार दिनांक २२ व २९ नोव्हेंबर, २००९ | २ दिवस |
| ५. | रविवार दिनांक ६, १३, २० व २७ डिसेंबर, २००९ | ४ दिवस |
| | एकुण | ३६ दिवस |

विद्यापीठाशी संलग्नित सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना या परिपत्रकाद्वारे निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी वरील वेळापत्रकाप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांच्या संपामुळे विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान आणि वाया गेलेले अध्यापनाचे तास भरून काढावेत.

१. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी शिक्षकांच्या संपकालावधीमध्ये वाया गेलेले अध्यापनाचे तास वरील वेळापत्रकाप्रमाणे शिक्षकांनी भरून काढल्यासंबंधी मा. कुलगुरूंना प्रमाणपत्र सादर करावे. असे प्रमाणपत्र प्राचार्यांकडून प्राप्त झाल्यावर विद्यापीठ प्रमाणपत्राचे आधारावर खात्री करून ते सह–संचालक, उच्च शिक्षण विभाग, नागूपर ह्यांना शिक्षकांनी संपकालावधीमधील वाया गेलेले तास पूर्ण केले किंवा नाही त्याप्रमाणे संबंधीत शिक्षकांना संप कालावधीतील पगार देण्यात यावा किंवा नाही अशी स्पष्ट व निसंदिग्ध शिफारस मा. कुलगुरू अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले सक्षम अधिकारी करतील. त्यानंतर शिक्षकांच्या संपकालावधीमधील शिक्षकांचे वेतन निर्गमित कर्ण्याविषयीची कार्यवाही शासन स्तरावर होईल.

२. विद्यापीठ स्तरावर संप कालावधीमधील अध्यापनाचे काम वरील वेळापत्रकाप्रमाणे होते किंवा नाही या विषयीची पाहणी करण्याकरिता मा. कुलगुरू विशेष पथकाची नियुक्ती करतील. तसेच अध्यापनाचे काम वेळापत्रकाप्रमाणे झाले किंवा नाही याविषयी विद्यार्थ्यांकडून देखील माहिती घेतली जाईल.

३. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी संप कालावधीमधील अध्यापनाचे तास भरून काढण्यासाठी वेळापत्रकाप्रमाणे शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे स्वतंत्र हजेरीपुस्तक ठेवावयाचे आहे. सदर हजेरीपुस्तक देखील तपासणीकरिता मागविण्यात येईल. महाविद्यालयाच्या स्तरावर वेळापत्रकाप्रमाणे अध्यापनाचे काम शिक्षकांकडून करून घेण्याची जबाबदारी ही प्राचार्यांची राहील. सुट्टी कालावधीतील वरीलप्रमाणे निश्चित झालेले वेळापत्रक विद्यार्थ्यांच्या माहितीकरिता महाविद्यालयातील सूचना फलकावर प्रसिद्ध करावे. याशिवाय सबंधीत विद्यार्थ्यांना त्या वेळापत्रकाची पूर्व कल्पना द्यावी.

४. अधिक माहितीकरिता महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांच्या संप कालावधीतील वेतन वितरित करण्याबाबत उपाययोजना सूचविणारे दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ रोजी निर्गमित केलेले परिपत्रक सोबत संलग्न केले आहे. या परिपत्रकातील सर्व निर्देशाचे काटेकोर पालन विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी करावे.

या परिपत्रकाद्वारे विद्यापीशी संलग्नित सर्व अशासकीय अनुदानीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी या परिपत्रकाप्रमाणे आपल्या स्तरावर कार्यवाही करून अनुपालन अहवाल विद्यापीठाला सादर करावा.

मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये

(डॉ. अरविंद चौधरी)
संचालक (म.वि.वि.म.)

*****

**प्रतिलिपी माहिती व योग्य कार्यवाहीकरिता अग्रेषित :**

१. विद्यापीठाशी संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य.
२. मा. कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
३. मा. प्र–कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
४. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासन, मुंबई
५. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे
६. सह–संचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर
७. विद्यापीठाचे सर्व अधिकारी व शाखा प्रमुख
८. सहायक कुलसचिव, विद्यापीठाचे गडचिरोली उपकेन्द्र, जिल्हा गडचिरोली.

—sd—
संचालक (म.वि.वि.म.)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज